पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 07/02/2020 (शुक्रवार)
(दुपार)

---

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. केळवद :—अंतर्गत 7 कि.मी. अंतरावर खुरजगाव फाटा येथे दिनांक 05/02/2020 चे 21:30 वा. ते 21:45 वा. दरम्यान फिर्यादीचा भाऊ नामे— विकास सुभाष मेश्राम, वय 26 वर्ष, रा. सावनेर हे त्यांच्या एमएच—40/ए—0403 क्रमांकाच्या मोटारसायकलने जात होते. दरम्यान अज्ञात वाहन चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक विकास मेश्राम यांचा जागीच मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— कुणाल भाऊराव मेश्राम, वय 28 वर्ष, रा. सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो. स्टे. केळवद येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक वाघाडे 7304210724 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर